PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Tujhya Majhya Sansarala Aani Kay Hav
Year: 2008

Song: He Kali Dharti Nangarleli
Lyricist: Guru Thakur

हे काळी धरती नांगरलेली
आली रं पेरणी
धावत ये रं काळ्या मेघा
किरपा आता करी
हे काळी धरती नांगरलेली
आली रं पेरणी
धावत ये रं काळ्या मेघा
किरपा आता करी
चिंब होऊ दे धरनी
रान सारं आबादानी
जीव जळं खुळ्यावानी
देवा किरपा करी
धावत ये रं काळ्या मेघा
किरपा आता करी आहा...
हिरवाईचं दान
नेसलं रानं....
भराला आज आलंजी
जोमानं बरसू दे पानी
काळ्या आईची करनी
तिला लेकराची माया
माय होईल हिरवी
गानं हिरीताचं गाया
वरती आभाळाची हाये
मला बापावानी छाया
साद माझ्या काळजाची
न्हाई जायची रं वाया
माझ्या शिवाराचं सोनं
येऊ दे रं औंदा छान
घाली पदरात दानं
देवा किरपा करी
धावत ये रं काळ्या मेघा
किरपा आता करी आहा...
हिरवाईचं दान
नेसल रानं....
भराला आज आलंजी
जोमानं बरसू दे पानी
हे बीज रूजलं रूजलं
माऊलीच्या उदरात
माझं शिवार आवार
आज आलयं भरात
सात जन्माची पुन्याई
घातली तू पदरात
पाय भरल्या खुशीनं
गोड हासते गालात
आलं डोळ्यामंदी पानी
जीव झाला खुळ्यावानी
सारी तुझीच करणी
देवा किरपा करी
धावत ये रं काळ्या मेघा
किरपा आता करी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*